म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. ७९३०

# गंधवेडी

सौ. मंदा बोडस



REFBK-0015567
REFBK-0015567

२।३।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र०
अनुक्रम ५३८३२ वि: काव्य
क्रमांक ९०३० नों दि: ५३८७९.

# गंधवेडी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५९८
ग्रंथ

: कवियित्री :

**सौ. मंदा बोडस**

REFBK-0015567
REFBK-0015567

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
लक्ष्मण गोपाळ परांजपे,
३०, खोताची वाडी, मुंबई ४.

प्रथमावृत्ति : मकरसंक्रांत्ति : १४ जानेवारी १९६६

मुद्रक :
व्ही. आर. बिरोडकर,
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
खेतवाडी मेन रोड, मुं. ४

ज्यांच्याकडून काव्याचा वारसा माझ्याकडे आला

ते माझे वडील

**कै. ती. दादा**

( कै. श्री. विठ्ठल महादेव कोल्हटकर,

लायब्रेरियन, स. प. कॉलेज, पुणें २ )

व

माझ्या पहिल्या कवितेपासून सतत कौतुक

करणारी माझी आई

**श्रीमती मनोरमाबाई कोल्हटकर**

**या दोघांना**

**सादर समर्पण**

**—सौ. मंदा बोडस**

# काव्य - मंदाकिनी

जो जो संस्कृति वाढत जाते तो तो कवित्व घटते, हा मेकॉलेचा सिद्धान्त खरा नाही. पण पुष्कळदा मनात येते की, सध्याचे " गिरणोदया " चे यंत्रयुग सौंदर्यवादी कवितेच्या " अरुणोदया "ला अनुकूल नाही. चंद्र, तारका, फुले, देवघर–नंदादीप–दीपमाळा, सरिता–सागर–सरोवरे, प्रणयाची ललित मंजुळ कूजने इत्यादींचा ' लुत्फ ' रसिक वृत्तीने चाखण्यासाठी जी फुरसत नि मनोभूमिका आवश्यक असते तीच ह्या धावफळीच्या ' कंबख्त ' जमान्यात झपाट्याने ओसरत आहे !

अशा या परिस्थितीत एकादी व्यक्ति सौंदर्यवेधी रसिकवृत्तीने काव्यदेवतेची उपासना करताना आढळली की, घनांधकारात दीपदर्शन झाल्यागत वाटते. सौ. मंदा बोडस यांची " गंधवेडी " कविता वाचून असेच वाटले.

' गंधवेडी ' हा सौ. मंदा बोडस यांचा पहिलाच कविता–संग्रह. ह्यातील बहुसंख्य कविता ह्यापूर्वीच नामवंत मराठी मासिकांतून आपणांस वाचावयास मिळाल्या आहेत. आज काव्य–क्षेत्रात कोठे विकृत लालसांचा दुर्गंध, कोठे दुर्बोधतेचे देव्हारे माजविणारा दर्प, कोठे विफलतावादाचा दमट वास डोकावत असताना, सौ. बोडस ह्यांच्या सद्‌भावनाच्या सुगंधाने सजलेल्या कविता खचितच कौतुकास्पद ठरतात ! क्वचित कोठे वृत्तरचनेच्या बाबतीत वा विशेषणाच्या योजनेत, " नवकाव्या "चा वाण त्यांच्या कवितांना लागलेला दिसतो; पण गुण लागलेला नाही !

सौ. मंदा बोडस ह्यांच्या ह्या काव्यसंग्रहात अनेक प्रकारच्या कविता आढळतील. काही ' राष्ट्रीय,' काही ' उपदेशपर,' काही केवळ निसर्गवर्णनात्मक. पण त्यांचे वैशिष्ट्य प्रकट झाले आहे ते कौटुंबिक कवितातच ! सौ. मंदा बोडस ह्यांची कविता ही घरंदाज बाळबोध गृहिणीची कविता आहे, असे थोडक्यात सांगता येईल.

त्यांच्या एका कवितेत पतिराज म्हणतात :

**गातां गातां अवघड तान**
**साथीच्या लयींत गुंफतेस।**
**मला मात्र अंगाई गातांना**
**बाळासह डुलतेस-तेव्हांच आवडतेस!**

थोड्याबहुत फरकाने त्यांच्या कवितेविषयी देखील रसिकांचे मत असेच पडेल!

ह्या बाळबोध कवियत्रीच्या काव्यात धन्यता पावलेल्या सुखी गृहस्थाश्रमाचे चित्रण ठायी ठायी उमटले आहे. येथे प्रेमळ सासू आहे; सहधर्मिणीचे प्रेमाने कौतुक करणारा पति आहे; 'आजी, तुझा वाढदिवस केव्हा?' असे विचारणारी मुले आहेत. "**गोल गोबऱ्या गालांत हसे अश्विनी पौर्णिमा**" अशी चिमुकली नक्षत्रासारखी मुलगी आहे. आणि मुख्य म्हणजे—

**अंगणात वृंदावन, देवापाशीं फुलवात**
**पवित्रता नांदे येथें स्वर्ग झुरतो मनांत।**
**माझ्या इवल्या घराची एकमेव मी स्वामिनी**
**काय तुझ्या पायापाशीं देवा, याहून मागूं मी?**

असे तृप्तीचे उद्‌गार काढणारी कर्तव्यदक्ष गृहिणी आहे.

आणि ही पतीलाच देव नि मुलांबाळांना पुण्याईची ठेव मानणारी गृहस्वामिनी तृप्त का असणार नाही? ऐका, पाडव्याच्या दिवशी तिला ओवाळणी घालताना पतिराज काय म्हणत आहेत ते—

**भरजरी शालू तुला दिसे सुरेख खुलून**
**परी साध्या वेषांतही आवडसी प्राणाहून।**
**काय घालूं ओवाळणी आज निराळी कळेना**
**मीच तुझा असतांना काय द्यावें समजेना**

ओवाळणी घालताना ते असे संभ्रमित झाले खरे. पण मकर-संक्रांतीला तिळगूळ घेताना धिटाईने ते म्हणतात—

**झाले आरक्त हे गाल मला हलवा देतांना**
**रंग बघुनी लाजतो, हलव्याचा लाल दाणा।**
**द्यायचाच असेल ग गोड तिळगूळ मला**
**ओठावरल्या तिळाची आहे अपेक्षा मनाला।**

अशा प्रेमळ दांपत्यावर येथे वडिलधाऱ्या मंडळीचा सदैव वरदहस्त आहे. त्यांना वयोवृद्धांचे मार्गदर्शन आहे. "**नको सूनबाई त्याला, नको उगाच रागावूं**" असे सांगणारी सासू, लहान बालकाचे संगोपन कसे करावे, ह्याचे घरगुती शिक्षण गृहिणीला देत आहे. अशा शिक्षणात नि संस्कारात वाढलेली गृहिणी कालांतराने आपल्या प्रेमळ सासूचाच धडा गिरविते. साऱ्या कुटुंबाची सेवा करण्यातच तिला आनंद असतो. ती सर्वांना हवी हवीशी वाटते. आणि ते सहाजिकच नाही का ? आपल्या मुलीच्या संसारात आता 'बाळाराजे' येणार ही चाहूल पत्रातून लागताच, पहिल्या बाळंतपणाच्या तयारीसाठी ती किती अधीर होते ! ती म्हणते—

**नको फुलूस मोगऱ्या इतुक्यांत पानोपानीं**
**माझ्या चंद्रकोरीसाठीं हवी रोज ताजी वेणी !**
**करा पाळणाहि नीट बोलावून सुताराला**
**आता येणार घरात नंदकिशोर सावळा**

ही आदर्श गृहिणी मुलाबाळांचे जसे कोडकौतुक करते तसेच त्यांना रोकडा उपदेश देखील. " पिंजऱ्यामधले वैभव मिळवण्यासाठी कैदीं बनू नकोस, अन् श्रमाकडे पाठ फिरवून ऐत खाऊ ऐदी बनू नकोस " असे तिचे सांगणे आहे.

सौ. मंदा बोडस यांचे मन मुख्यत: कुटुंबाच्या सुखदु:खात रमले असले तरी त्याला समाजाच्या नि देशाच्या सुखदु:खांचीहि जाण आहेच. म्हणूनच गोमंतक-विमोचन, नेहरू-निर्वाण इत्यादि विषयांवर त्यानी कविता लिहिल्या असून अहल्या, सीता, नामदेव, शिवराय, श्रीकृष्ण अशा वंद्य विभूति त्यांच्या काव्याचा विषय बनल्या आहेत. " सारे सारे नकली आहे " ह्या कवितेत प्रचलित परिस्थितीतील दांभिकतेवर त्यानी टीका केली आहे. 'राष्ट्रीय' नि 'सामाजिक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ह्या कवितांपैकी महाराष्ट्र-गौरवपर कविता विशेष चांगल्या उतरल्या आहेत—

**माझ्या मराठी भाषेचा काय सांगू मोठेपणा**
**ज्ञानेश्वरी हीच बोले, रंगे त्रैलोक्याचा राणा।**
**माझ्या महाराष्ट्र देशीं अरेतुरेचीच भाषा**
**करी आदर–सत्कार जरी घांस भाकरीचा।**

इत्यादी ओळींतून त्यांचा जाज्वल्य महाराष्ट्राभिमान दिसून येतो. पण एकंदरीत ह्या कविता ठराविक रूढ चाकोरीतून जाणाऱ्या नि धोपटमार्गी बनल्या आहेत. 'बर्फ पेटला हिमालयावर' ही कविता तर उघड उघड कुसुमाग्रजांच्या कवितेचे अनुकरण करते.

अनुकरणावरून बरे आठवले. सौ. मंदा बोडस ह्यांचा हा पहिलाच काव्य संग्रह. त्यात अनेक ठिकाणी अनुकरण नि अनुवाद आढळणे क्रमप्राप्तच आहे. उदाहरणार्थ—"काळ्याभोर नयनात नको रेखूस काजळ" (लोचने हरिण-गर्व–मोचने, मा विदूषय नतांगि कज्जलैः।); "जिंकलेस त्याच क्षणी, स्वतः शरण येउनी' (She stoops to conquer) "दुःखामागुनि सुख, न्याय नियतिचा" (सुखस्यानंतरं दुःखं, दुःखस्यानंतरं सुखम्) इत्यादि कल्पना केवळ अनुवादात्मकच आहेत. "उर्मिला, आई" इत्यादि कविता देखील ह्याच जातीच्या–अतएव सामान्य ठरतात.

सौ. मंदा बोडस ह्यांच्या निसर्गात रंगलेल्या कवितांचे क्षेत्र विशाल वा भव्योदात्त नसले तरी रम्य आहे. ह्या कवितांत त्यांची फुलांची, पुष्प–परागाची सुगंधाची आवड विशेष स्पष्ट होते. आणि त्या जेव्हा गृहिणीच्या दृष्टीने निसर्गाकडे पाहू लागतात, तेव्हाच निसर्गकवितांना खरीखुरी खुमारी प्राप्त होते.

**झाला ज्येष्ठांत विवाह मेघराजाशीं सांवळ्या**
**थेंबाथेंबाच्या बांधल्या तेव्हां तिनें मुंडावळ्या**
**मांडियेला पूजेसाठीं उंच गिरीचा चौरंग**
**नक्षत्रांच्या रांगोळींत भरे आगळाच रंग!**

अशी सृष्टीची मंगळागौर श्रावणात सजते!

अंगणातील 'केळीचे झाड' हा नित्याचा परिचित विषय. पण तोहि मंदा बोडस यांनी मोठा रोचक केला आहे; "केळी" ला द्रुपदकन्येचा साज चढविला आहे. हा असा—

**शालू पोपटी रेशमी शोभे नितळ कांतीला**
**आला वसंत बहार सुकुमार लावण्याला**
**वस्त्रें असंख्य नेसवी तिला प्रेमानें श्रीरंग**
**पतिव्रता द्रौपदीची आहे सख्खी ही बहीण**

— मंदा बोडस ह्यांच्या काव्यसंग्रहाचे हे बाळबोध [ पण जुनाट नि जीर्ण नसलेले ] मर्यादाशील नि मधुर स्वरूप लक्षात घेता, त्याचे मनःपूर्वक स्वागत होईल, अशी आशा वाटते. आणि त्यांच्याकडून 'सत्यं शिवं सुंदरम्' ह्या त्रिमूर्तींची पूजा बांधणारे याहून उत्तम कवित्व निर्माण होईल, अशी अपेक्षा निर्माण होते. मंदाताईच्या ह्या काव्य-मंदाकिनीची गतिमानता, सखोलता, सुंदरता नि समृद्धता दिवसेंदिवस वर्धमान होऊन, तिचे रसिक जन-सागराशी सुखद मिलन होवो, हीच शुभेच्छा.

"पारिजात"
तुळसी पाइप रोड,
मकरंद सहनिवास,
दादर, मुंबई २८.

**—विद्याधर गोखले**

# मनोगत

'गंधवेडी' हा माझा पहिला काव्यसंग्रह रसिकांच्या हातात देताना मला अतिशय आनंद होत आहे. पण त्याबरोबरच माझ्या गंधवेड्या मनाने टिपलेले सुगंधी क्षण रसिकांना क्षणभर तरी सुखावतील का नाही ?, अशी शंकाहि मनांत डोकावते आहे. कसेहि असो. शारदादेवीच्या काव्यदरबारात पहिले पाऊल टाकण्याचे धाडस मी केले आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन श्री. विद्याधर गोखले यानी प्रस्तावना लिहून देण्याचे कबूल केले आणि त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. त्यांच्या सारख्या चोखंदळ रसिक, श्रेष्ठ नाटककार, उत्कृष्ट लेखकाची प्रस्तावना या काव्यसंग्रहाला लाभली हा मी मोठा लाभच समजते. प्रस्तावनेला 'काव्यमंदाकिनी' अशी सुरवात करून त्यानी आपली रसिकता प्रथमच प्रगट केली आहे. त्यांच्यापाठीमागे कामाचा अतिशय व्याप असूनसुद्धा त्यानी आपलेपणाने प्रस्तावना लिहून दिली, त्याबद्दल त्यांचे शाब्दिक आभार मानायला मला शब्दच सापडत नाहीत. मी त्यांची ऋणी आहे.

काव्याची आवड व निसर्गाची ओढ मला अगदी लहानपणापासूनच आहे. "खूप वाचावे आणि खूप प्रवास करावा" असे मला नेहमीच वाटे. पण खूप लिहावे किंवा आपण लिहू शकू असे मात्र वाटत नसे. पण एकदा सहज लिहिले नि मग हे वेड वाढतच गेले.

माझ्या कविता–कन्येचे कोडकौतुक करायला माझे वडील हयात नव्हतेच पण माझी आई व आजी [ श्रीमती अन्नपूर्णाबाई गोविंद काळे, आंजर्ले ] यानी मात्र माझ्या या छंदाचे अतिशय कौतुक केले.

माझी मोठी बहीण, सुप्रसिद्ध कवियत्री सौ. उषा लिमये एम्. ए. नागपूर हिने मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले आणि मार्गदर्शनहि केले.

माझे पति डॉ. यशवंतराव वासुदेव बोडस M. Com. [ Journalist Bombay ] व दीर श्री. राम बोडस, यांनी या काव्यसंग्रहासाठी अतिशय

मेहनत घेतली. त्यांनी जर मनावर घेतले नसते तर हा काव्यसंग्रह निघूच शकला नसता.

तळोदे येथील एक लोकप्रिय रसिक शिक्षक श्री. एस्. बी. शिंपी. बी. ए. ( ऑनर्स ) यांनी अतिशय आपुलकीने आणि रसिकतेने या संग्रहातील कवितांची निवड करून दिली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

या संग्रहातील बऱ्याच कविता पूर्वी निरनिराळ्या मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या कविता या संग्रहात छापण्यास त्या त्या मासिकांच्या संपादकांनी संमति दिली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

'ज्योत्स्ना प्रकाशनने' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. प्रकाशक श्री. ल. गो. परांजपे यानी फक्त प्रकाशक या दृष्टीने या पुस्तकाकडे न पहाता आत्मीयतेने लक्ष दिले, एवढेच नव्हे तर अगोदर स्वीकारलेली कामे असूनहि या काव्यसंग्रहाचे काम हाती घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत. श्री. परवांसारख्या श्रेष्ठ चित्रकाराने मुखपृष्ठाची सजावट करण्याचे मान्य केले, आणि गंधवेडीला सौंदर्याचा साज चढवला, त्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. या सर्वांचे गंधवेडीवर फार मोठे ऋण आहे पण या ऋणातून मुक्त होण्याची माझी इच्छा नाही. त्या ऋणातच मला आनंद आहे.

शेवटी मला आठवण येते माझ्या सासूबाईंची [ श्रीमती यशोदाबाई बोडस, जुन्नर ] त्यानाही काव्याची आवड होती; कौतुक होते. शेवटच्या आजारपणातहि त्या मला विचारीत—" नवीन कविता केली आहेस का ? केली असेल तर वाचून दाखव ना.......... " आज त्या असत्या तर त्यांना खूप आनंद वाटला असता. असो.

माझ्या गंधवेड्या मनाने हा काव्यसंग्रह रसिकांसमोर सादर केला आहे. यांतील एखादी सुगंधी झुळुक जरी रसिक मनाला पुलकित करू शकली तरी माझ्या मनाला सार्थकता वाटेल.

सौ. मंदा बोडस.
C/o डॉ. य. वा. बोडस.
तळोदे.
जिल्हा : धुळे.

—सौ. मंदा बोडस

# अणुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| शारदेस | १३ | कोसळले वज्र | ३६ |
| गंधवेडी | १४ | जन्म द्यायचा असेल | ३७ |
| माघातली रात | १५ | लेकीचे पत्र | ३८ |
| माझ्या संसारात | १६ | अश्रू | ३९ |
| माझा महाराष्ट्र | १७ | वय सोळावे | ४० |
| तेव्हांच आवडतेस | १८ | श्रावणाची रात्र | ४१ |
| महात्मा गांधीजींच्या चरणी | १९ | सख्यास | ४२ |
| आला श्रावण धावून | २० | उर्मिला | ४३ |
| ऋतुराज | २१ | कशी सांगू ! | ४४ |
| बर्फ पेटला | २२ | महाराष्ट्र | ४५ |
| देवास | २३ | इच्छा | ४६ |
| अबोला | २४ | नको उगाच रागावू | ४७ |
| उन्माद | २५ | अहल्या | ४८ |
| साम्य सांपडता थोडे | २६ | स्मृति | ४९ |
| देवाची तक्रार | २७ | बदली | ५० |
| नकोस दावूं | २८ | केळ | ५१ |
| आजीचा वाढदिवस | २९ | रुसवा | ५२ |
| प्रचलित जग | ३० | श्रावण सरीस | ५३ |
| ओवाळणी | ३१ | गुपित | ५४ |
| हीच काय तव नीति ? | ३२ | अंकुर | ५५ |
| तिळगूळ | ३३ | किशोरीस | ५६ |
| वनराणीची मंगळागौर | ३४ | वठलेल्या वृक्षा लाभे | ५७ |
| शिरशिरी | ३५ | ओली पहाट | ५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| पौर्णिमा | ५९ | ते सुवर्णक्षण | ७६ |
| विरहिणी | ६० | का म्हणूं | ७७ |
| व्यर्थ जीवन | ६१ | कौतुक | ७८ |
| नको खंत | ६२ | मला उमगले | ७९ |
| नको रेखूस काजळ | ६३ | देव्हारा | ८० |
| कां आलीस तूं | ६४ | नामदेव | ८१ |
| अश्विनी | ६५ | अभंग | ८२ |
| आई | ६६ | शिवनेरीचा फत्तर म्हणतो | ८४ |
| पहिली रात्र | ६७ | साकार स्वप्न | ८६ |
| पांखरास | ६८ | प्लॅटफॉर्म | ८७ |
| विसर | ६९ | तोल | ८९ |
| प्रणयाचें विश्व | ७० | माझें घर | ९० |
| कसें सांगू ? | ७१ | मुग्धा | ९२ |
| यावेळी | ७२ | लबाड डोळे | ९३ |
| रूप तुझें पाहतें | ७३ | खेळ संपला | ९४ |
| झरा | ७४ | अति तेथें माती | ९५ |
| भिल्लीण | ७५ | पारिजात | ९६ |

म. ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५५९७
दा. क.

शारदे, मी तव कन्या सान
लिहवी माझा हात धरूनी तूं, मंगलदायक गान ॥

तूं ज्ञानाची भाग्यदेवता
तूं विद्येची सखोल सरिता
तृषार्त होऊन आले आतां, दे मजला वरदान ॥

तव दरबारी चंद्रासम कुणी
रसिक मनाला घालि मोहिनी
मानलीस मज पणती चिमणी, तरि होइल सन्मान ॥

घडुंदे सेवा तुझीच थोडी
बाळगली मी आशा वेडी
धरला हात न आतां सोडी, तुझाच तो अपमान ॥

# गंधवेडी

गंधवेडा पारिजात
मला वाटे प्रिय सखा
चांद्रातीचा गारवा
रुचे चंदनासारखा।

चंद्रतारकांशीं माझी
झाली जणुं सोयरीक
काव्यीं होऊनीया धुंद
भेटी घेते मी कितीक।

नदी सागरा मिळतां
तिच्यामागें धांवे मन
डोंगराच्या कुशींत ते
शिरे लहान होऊन।

निसर्गांत मिसळून
वाटे व्हावें एकरुप
गंधीं विरून जाऊन
पूजावा तो परमेश।

— अनुराधा

माघ राजाच्या मादक
मिठीमध्यें धरा हंसे
गळे ओढणी धुक्याची
शुद्धी परी तिला नसे ।

प्रेमवेड्या राधेलाही
ओढ लागे मोहनाची
घेइ घडा उचलून
वाट चाले यमुनेची ।

सूर गोड बांसरीचा
पडतांच कानांवर
ऊर भरे आनंदानें
होती पैंजण अधीर ॥

होतां राधा एकरूप
सुरासुरांच्या विश्वांत
माघामधल्या रात्रीला
चढे आगळी रंगत ॥

— वसंत

माझ्या संसारांत देवा! रुप तुझें मी पाहते
माझ्या भरल्या घरांत तुला रोज न्याहाळते।

माझ्या सोन्याच्या संसारीं आहे आनंदाचा वास
रात्रंदिन लाभे त्याला प्रेमाचा तो सहवास।

अंगणांत वृंदावन देवापाशीं फूलवात
पवित्रता नांदे येथें स्वर्ग झुरतो मनांत।

दिन जातो भराभर रात रंगते चंदेरी
हंसुनिया सांगे पूर्वा आतां संपली शर्वरी।

आशीर्वाद सर्वांचाच माझ्या चिमुकल्या घरा
'लक्ष्मी' आनंदानें घाली घरांमध्यें येरझारा।

चाले सदा गडबड चिमुकल्या पावलांची
गोड बोबड्या बोलांत गोडी लपे अमृताची।

माझ्या इवल्या घराची एकमेव मी स्वामिनी
काय तुझ्या पायापाशीं देवा, याहून मागूं मी?

— स्त्री

त्रिखंडांत गाजलेली कीर्ति ज्याची गाती भाट
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥
भोळा भाबडा रांगडा मराठा हा या देशाचा
कडा कातक कठोर कणखर सह्याद्रीचा
झुळुझुळु वाहे झरा कोट फोडी कातळाचा
तसें प्रेम अंतरांत भरलेलें कांठोकांठ
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥
कलावंत महाराष्ट्र पहा वेरूळच्या लेणीं
पत्थराला केलें धन्य ज्यांच्या छिन्नी हातोड्यांनी
कलेसाठी राबली ही कलावंतांची घराणीं
गरीबींतही रंगला सौंदर्याचा सारीपाट
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥
नररत्नांची निर्मिती करी येथलीच माती
पौरुषाला आवाहन होतां विस्तारते छाती
वीररसाचा पोवाडा रंगे शाहीरांच्या ओठीं
शिवप्रभूची भवानी नाचे दुष्टा निर्दाळत
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥
माझ्या मराठी भाषेचा काय सांगू मोठेपणा
"ज्ञानेश्वरी" हीच बोले रंगे त्रैलोक्याचा राणा
सोळा शृंगारांत भिजे घेत लावणीच्या ताना
तुकारामाची ऐकतां गाथा नाचे भीमाकांठ
असा माझा महाराष्ट्र असा माझ्या महाराष्ट्र।
कण कण या मातीचा मला प्राणाहून प्यार
असो घांस भाकरीचा माया लाभते अपार
साध्या ओवींत गुंफले अमृतानें सप्तस्वर
तुच्छ वाटते त्यापुढें मला स्वर्गाचीही वाट
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥

— वसंत

शृंगाराच्या साधनांनीं सजून
मेनका-उर्वशी बनतेस
मला मात्र काम करतांना
कुरळया बटा मागें सारतेस—तेव्हांच आवडतेस!

धुंद नजर, उडता पदर
लक्ष वेधण्यासाठीं सांवरतेस
मला मात्र प्रणयांत भिजलेली
नजर खालीं वळवतेस—तेव्हांच आवडतेस!

गातां गातां अवघड तान
साथीच्या लयींत गुंफतेस
मला मात्र अंगाई गातांना
बाळासह डुलतेस—तेव्हांच आवडतेस!

आकर्षक व्यक्तिमत्वानें
सर्वांना आकर्षून घेतेस
मला मात्र माझी होऊन
मिठींत विरघळतेस—तेव्हांच आवडतेस!

अहिंसेचा मानकरी शांततेचा महावीर
तुझ्या चरणीं रे माझा नम्रतेचा नमस्कार ।

सत्य हाच एक धर्म सत्य हाच देव तुझा
हातीं पताका ऐक्याची शस्त्राविना लढा तुझा ।

तुझें वागणें आगळे तुझा उत्साह वेगळा
क्षमा तुझी अन्यायाला असा न्यायही निराळा ।

कितीकदां विरोधानें तुला कोंडलें घेरून
घेसी निर्भयपणानें संकटांना बोलावून ।

मानवाच्या हृदयांत तुला राम गवसला
अपंगांच्या सेवेमध्यें तुला स्वर्ग सांपडला ।

तुझ्यासारखे 'पुरुष' जन्म घेती युगांतून
"राष्ट्रपिता" ऐसा मान येई पायांशीं चालून ।

## आला श्रावण धांवून

श्रावणाच्या वर्षावानें गंधवती पृथ्वी झाली
तारुण्याच्या नव्हाळीची प्रभा आगळी फांकली ।

ओलेतीस पाहूनीयां हंसे खट्याळ श्रावण
फेकी हिरव्या शालूस बघे हळूच चोरून ।

रुसलेली नववधू दिसे लाघवी सुंदर
ऊन कोवळे प्रेमाचें पसरीतो अंगावर ।

हिरव्या त्या शालूवर फुलें सोन्याची गुंफिता
वेळ पुरेना धरेला साजशृंगार करितां ।

गंधारला ओला वारा झोंबे हिरव्या अंगाला
थरारली पानोंपानीं हांक मारिते प्रियाला ।

प्रियतमेच्या हांकेला आला श्रावण धांवून
जलधारांच्या करांनी देई घट्ट आलिंगन ।

प्रेमवर्षावांत त्याच्या श्वास कोंडे धरित्रीचा
अंकुरला मीलनांत सारा संसार उद्यांचा ।

— अनुराधा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५५९८
दा. क्र.

आला वसंतऋतु आला
गर्द राईंतुन गाते सुस्वर, ऋतूसखी कोकिळा ॥

ऋतुराजाची ओढ अनावर
लागुन फुलला हा गुलमोहर
कळ्याफुलांतुन भरलें अत्तर, फुले मोगरा खुळा।

राजस्वागता तयार व्हावें
आम्रमंजिरीसवें हंसावें
निरोप कळतां हळुं डोकावें, चांफा परसांतला ॥

हिरव्या मखमालीवर फेकी
मदनसखा चारुता अनोखी
शृंगाराची तऱ्हा आणखी, शिकवी जगताला ॥

त्यांतच फुलली चैत्र पौर्णिमा
शुभ्र चांदणें, हंसे चंद्रमा
व्याकुळ राधा ही घनःशामा, मदनबाण लागला ॥

— वसंत

बर्फ पेटला हिमालयावर
उचल भारता पाउल खंबिर ॥

नकोत आतां वाटाघाटी
नकोत आतां भेटीगांठी
अमृत ओठीं जहरच पोटी
असे शत्रुचें कपटी अंतर ॥

"भाई भाई" असें म्हणोनी
सुरी खुपसली उरांत ज्यांनीं
आले उशिरां अपुल्या ध्यानीं
मित्र नव्हे हा सर्प भयंकर ॥

असो, जाहले तें जाऊं द्या
राष्ट्रासाठीं सर्वस्वच द्या
धनदौलत द्या, तरुण रक्त द्या
जयघोषानें घुमवा अंबर ॥

विजय आपुला आहे निश्चित
भारत राखिल सत्य सदोदित
कधीं न टाकूं अपुरें हें व्रत
कोपे आतां भोळा शंकर ॥

— वार्ता

तुझ्यावर माझा
अढळ विश्वास
कृपेचीच आस — माझ्या चित्ता ॥

मातीत पडतां
कस्तूरी चुकून
माती होते पण — गंधवती ॥

सुगंधी पुष्पांचा
हार तो गुंफीतां
येते मादकता — दोऱ्यालाही ॥

चांदण्यांत न्हातें
झुडुप कांटेरी
रंग चढे वरी — मुलायम ॥

तैसे तुझें नांव
येतां माझ्या ओठीं
होतो जगजेठी — पावन मी ॥

बोलायचें नव्हतें तर आलीस कशाला ?
भुवयांचें नर्तन प्रश्न करी कसला ?

गुरफटायचें होतें अबोल्याच्या विर्णीत
मग अबोलीची वेणी केसांत कां माळलीस ?

ओळख नसल्यासारखे फिरवलेस डोळे
पायाचा अंगठा मात्र, उकरतो प्रेम ओले

तोऱ्यांत निघून जातां कां ग अडखळलीस ?
अबोला झाला बोलका, म्हणून कां रुसलीस ?

— स्त्री

# उन्माद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५०३६३२ वि: काव्य
क्रमांक १०३२ नोंद दि: २।३।७९

नदी चालतां रागांत      येई आडवा किनारा
मारी धडक जोरांत      थरथरला ओला वारा।
विनवितो किनारा हा      नको उल्लंघूस पोरी
रूढीधर्मानें आंखल्या      रेषा नीतीच्या भूवरी ॥
घोंघावत बोले नदी      बघा चंद्रमा आकाशीं
स्वैर विहरतो तेथें      तरी बिलगे धरेशीं।
नाहीं पटलें बंधन      तारुण्याच्या उन्मादांत
धांवे! उफाळे! झुगारी      किनाऱ्याचा वृद्ध हात
उल्लंघता सीमा झाला      चोहींकडे हाहाकार
कोसळला किनाराही      अश्रू ढाळे चराचर
अंतर्मुख झाली नदी      चूक कळे, वळे मागें,
ढांसळत्या जीवनाचें      कसे जुळावे ते धागे।

— वाङ्मयशोभा

चिमुकली बाळ माझी जणुं रतीची प्रतिमा
गोल गोबऱ्या गालांत हंसे अश्विनी पौर्णिमा
जिवणी ही रेखियली इवलीशी लाल लाल
हंसतांच हास्यांतून खुले मौक्तिकांची माळ
मत्स्यकन्येचे तेजस्वी नेत्र आणले चोरून
नक्षत्रांचें तेज सारें त्यांत ठेविलें जपून
काळी कुरळी ही बट रुळे सदा भालावर
हिमगौर वर्णा तिच्या येई शोभा मनोहर
तिचे बोबडेसे बोल जणुं सूर सारंगीचे
सुरांसुरांतून वर्षे गोड अमृत स्वर्गीचें
विधाता या सौंदर्याला लावी परि गालबोट
नासिका ही रुतलेली दोन्ही गोबऱ्या गालांत
म्हणतांच असें कोणी हर्ष दाटतो उरांत
साम्य सांपडतां थोडें पोरी तुझ्या नि माझ्यांत

— वसंत

फोडा फोडा सारी दारें  काढा कुलुपांची खीळ
माझ्या दर्शनाला नको  नको ठराविक वेळ।
बांसरीच्या सुरांसंगे रंगलों मी गोकुळांत
लोणी चोरून खातांना सरे सोनेरी प्रभात।
गवळ्यांच्या घोळक्यांत काला करून जेवलों
घोंगडीच्या शय्येवर आरामांत पहुडलों।
सुदाम्याच्या पोह्यांपुढें फिक्कें वाटलें अमृत
कण्या विदुरा घरच्या खाऊनी मी झालों तृप्त।
द्रौपदीच्या प्रेमाचेंच हवे वाटे एक पान
शबरीच्या बोरांसाठीं आज आसुसलें मन।
नानाविध पक्वानांनीं माझा गाभारा भरला
भावभक्तीवरी माझा जीव सदा गुंतलेला।
सुवर्णाची शेज नको नको वस्त्रें जरतारी
नको नाण्यांचा पाऊस नको कौतुकें हीं सारी।
तळमळ चाले माझी भव्य मंदिरीं राहून
मूर्तीरुप सोडूनीयां जावें वाटतें पळून।
वदला हे सारे सारे सारे दरवाजे खोला
मला प्रेमें आलिंगू दे भाव भावडा नि भोळा।

— स्त्री

नकोस दावूं मला प्रलोभन
आतां न उरलें कांहीं नातें
मार्ग जाहले भिन्न आपुले
विसर सख्या तूं, तुझ्या प्रियेते ॥

कितीकदां कर करांत गुंफुन
उन्मादक धुंदींत चाललों
स्वप्नींच्या स्वर्गांत रमूनी
वास्तवतेला विसरुन गेलों ॥

परी आज ना उरलें कांहीं
तूं परकीचा, मी दुसऱ्याची
स्वप्नांमधला स्वर्ग वितळला
उरांत सलतें स्मृति प्रीतीची

अवचित येऊन सुगंधापरी
मनांत दाटे तुझी आठवण
स्वप्नीं तुज मी रोज भेटतें
दिवसा स्मरतें तो मिलन क्षण ॥

— वसंत

वाढदिवस आजीचा कधीं येतो, विचाराया
आलीं नातवंडें सारीं आजीपाशीं जमूनिया ।
पंजोळच्या अंगणांत झाड वडाचें जें मोठें
जन्म झाला माझा तेव्हां होतें लहान रोपटें ।
वर्ष सहावें लागतां वडिलांना झाली घाई ।
झालें नवी नवरी मी आलें याच घरीं बाई ।
वन्संबाईंना पहाया पुण्याहून आले भट
त्याच वेळेला जाहला माझा मखराचा थाट ।
लग्न भाऊजींचें झालें फार थाटांत तोऱ्यांत ।
मला पाणीही पचेना तरी गुंतलें कामांत ।
मोठ्या वन्सबाईसाठीं केलें चांदणी जेवण
त्याच रात्रीला जन्मला माझा सांवळा श्रीकृष्ण ।
विस्तारला वंशवृक्ष झाला मोठा भव्य वड
तुम्हां साऱ्या नातवांची चाले गोड गडबड ।
नका विचारूं रे वय वेड्या भोळ्या म्हातारीला
गोष्ट सांगतें सुरेख या रे कुशींत लपाया ।

— रोहीणी

सारें सारें नकली आहे
बुद्धीच जिथें फसली आहे
मानव अजून जंगली आहे
मानवता तर झिंगली आहे
दिसते तसें असत नाहीं
कुणी कुणाला पुसत नाहीं
शृंगाराशिवाय विषय नाहीं
बोलण्याला तर आशय नाहीं
'मुखपृष्ठ पहा' सुंदर आहे
आंत मात्र अंधार आहे
सुंदर चेहरा आकर्षक आहे
पावडर पुसेल तर भयंकर आहे
उभार बांधा खोटा आहे
खऱ्याचें कपाळीं गोटा आहे
आदर प्रेम दिखाऊ आहे
द्वेष आंतून पेटला आहे
गर्व आंतून ताठला आहे
पाप केलें तरी मान मिळतो
पुण्यवानास कोण पुसतो?
पैशासाठीं धडपड आहे
ओंगळ फसवी रडारड आहे
पैशापाशीं सारे आहे
ज्ञान आहे, गुण आहे
सौंदर्य आहे, रसिकता आहे
ऐश्वर्य आहे, औदार्य आहे
खरा रसिक मेला आहे
असेंच जीवन चाललें आहे
सारें सारें नकली आहे

# ओवाळणी

आज पाडवा म्हणून हवा कशाला हा थाट
हवी रांगोळी कशाला ? हवा कशाला ग पाट ?
माझी मूर्ति दिसे मला सखे तुझ्या हृदयांत
माझें सुख लपलेलें सखे तुझ्याच ओठांत
नयनांच्या निरांजनें रोज मला ओवाळसी
स्निग्ध प्रेमाचें अमृत रोज लाभतें मजसी
माझे सारे भाग्य-सौख्य आहे सखे तुझ्या हातीं
आशाआकांक्षा ग साऱ्या तुझ्या भोंवतीं गुंजती
भरजरी शालू तुला दिसे सुरेख खुलून
परी साध्या वेषांतही आवडसी प्राणाहून
काय घालूं ओवाळणी आज निराळी, कळेना
मीच तुझा असतांना काय द्यावें ! समजेना

तुझेंच मन हें तुला विचारी सांग त्यास रघुपती
राघवा हीच काय तव नीति ?
सौंदर्यानें उर्वशि-रंभा
पवित्र जैसी पावन-गंगा
जीवन अर्पुनि तुझिया चरणीं अभागिनी कां सती ? ॥

वनवासांतही वल्कल नेसुनी
छायेपरी तव आली मागुनी
प्रीतिस्तव तव कष्ट वनांतिल सोशी पुण्यवती ॥

असा कसा तूं राजा रघुवर
राज्ञीलाही करिसी पामर
सोडुन जाते वैदेही तुज तिला नसे माहिती ॥

नकोस फिरवूं वदन राघवा
रघुवंशाचा उज्वल ठेवा
निरपराध ती, तिज पाठविसि का वनवासाप्रती ॥

नामानें तव तरला सागर
पदस्पर्शानें पावन भूसुर
तुलाच जारे शरण तूं स्वतः त्रैलोक्याधिपती ॥

देशी कशास सखये तिळगूळ माझ्या हातीं ?
पुरे गुंतवून ठेवी मला तुझी गोड प्रीती
बघूं कशास मी कांटा हलव्याचा टोंकदार
कांटा प्रीतीचा रुतला हृदयांत खोलवर
ठेवी तिळाला झांकून साखरेचा शुभ्र पाश
मीही मला विसरतो जेव्हां पडे करपाश
झाले आरक्त हे गाल मला हलवा देतांना
रंग बघुनि लाजतो, हलव्याचा लाल दाणा
द्यायचाच असेल ग तुज तिळगुळ मला
ओठावरल्या तिळाची आहे अपेक्षा मनाला

— स्त्री

# वनराणीची मंगळागौर

आला श्रावणाचा मास वनराणी आनंदली
माहेरच्या मायेमध्यें सुखावली, बहरली ।
झाला ज्येष्ठांत विवाह मेघराजाशीं सांवळ्या
थेंबाथेंबाच्या बांधल्या तेव्हां तिनें मुंडावळ्या ।
मीलनाची पहीलीच रात स्मरतां लाजली
धुंद मातीच्या सुगंधीं काया कोमल भिजली
निळा महाल सोनेरी किरणांनीं सजविला
देवी मंगळागौरीचा थाट बिजलीनें केला
मांडियेला पूजेसाठीं उंच गिरीचा चौरंग
नक्षत्रांच्या रांगोळींत भरे आगळाच रंग
सजली ही वनराणी शालू हिरवा नेसून
इंद्रधनूची सुरेख वेणी केसांत माळून
लावीयेला प्रेमभरें चंद्राचा हा नंदादीप
पतिदेवासाठीं मागे औक्ष, वैभव अमाप
नेत्र कमळें मिटतां कुजबुजे वारा कानीं
मेघराजाच्या स्पर्शानें शहारली पानोंपानीं

— अनुराधा

हिरव्या गर्द पानांतून
एक शिरशिरी शहारली
दंवबिंदूच्या झळाळींत
लाजतच डोकावली ॥

आरस्पानी आरशांत
रुप दिसे सप्तरंगी
भुलला चावट वारा
बिलगला अंगोअंगीं ॥

ढकलून देतां त्याला
फुलें खुशाल हंसली
कवी मात्र म्हणे तिला
"तूं असली ग कसली ?

— गांवकरी

हिमालयावर पुन्हां एकदां
कोंसळलें वज्र
शुभ्र शांत तनु महामुनीची
शहारली आज।
अमोल ठेवा रत्न जवाहर
काळानें गिळला।
भारतभूच्या सुखस्वप्नांचा
पाया कोंसळला।
व्याकुळ झाला शेष अंतरीं
पृथ्वी डळमळली
कालपुरुषही थांबे क्षणभर
दुःखाश्रू ढाळी।
जनतेच्या हृदयाचा राजा
अबोलका झाला
युगायुगांना जोडत असतां
दुवाच ढांसळला।
सत्य अहिंसा न्याय जाहलें
पोरकेच आतां
धरा गद्‌गदे दुःखें अंतरिं
सुपुत्र हा जातां॥
आज 'जवाहर' गेले अमुचे
शांतीदूत गेला
सौंदर्याचा गुलाब सुकला
अश्रूसर गळला॥

— नवनीत

जन्म द्यायचा असेल
पुन्हां मला भूमीवरी
कळी जाइचीच व्हावें
वाटे मजला अंतरीं
लतिकेच्या अंकावर
सुगंधानें मोहरेन
कोणा भाविकाच्या हस्तें
कंठीं तव विराजेन

जन्म द्यायचा असेल
दे रे देवा तुळशीचा
तुझ्या चरणी घालीन
सडा रोज मंजिरीचा
तुझसवें रोज मला
पूजतील सुवासिनी
तुझ्या सहवासें देवा
धन्य होईन जीवनीं

जन्म द्यायचा असेल
देवा फिरून जगतीं
चंदनाच्या झाडाचा दे
त्याच्यावर खरी प्रीती
कणाकणानें झिजेन
सदा दुसऱ्यासाठीं
टिळा बनून चंदनी
येईन मी तुझ्याभेटीं

जन्म द्यायचा असेल
तर होउंदे पणती
तुझ्या मंदिरीं तेवतां
लाभो देवा मला मुक्ती
माझ्या सौम्य प्रकाशांत
रूप तुझें न्याहाळीन
इवल्याशा ज्योतीनें मी
तेजालाच ओवाळीन

— गांवकरी

पत्र लाडक्या लेकीचें आलं कालच्या डाकेनं
म्हणे आठवण येते तुझी राहून राहून ।
सोनियाच्या संसारांत न्हाते स्वर्गसुखीं जरी
आई, खाविशी वाटते तुझ्या हातची भाकरी ।
हळूं वेंचावीत फुलें माहेरच्या प्राजक्ताचीं
वाटे केसांत माळावी वेणी सोनकेवड्याची ।
आणि बाबांच्या प्रेमाचें गोड सूर आळवावे
तुझ्या कुशींत लपून सर्व जगा विसरावें ।
पत्र वाचतां कळालें किती लपविलें जरी
चिमुकल्या पावलांची तिला चाहूल लागली ।
घाला बाई सारवण दाट दाट अंगणांत
भारावल्या लेकीसाठीं हवी स्वच्छ पायवाट ।
नको फुलूंस मोगऱ्या इतुक्यांत पानोपानीं
माझ्या चंद्रकोरीसाठीं हवी रोज ताजी वेणी ।
करा पाळणाही नीट बोलावून सुताराला
आतां येणार घरांत नंदकिशोर सांवळा ।
नका हंसू, थट्टा करूं धरा थोडा प्रौढपणा
आतां आजोबा म्हणून पुकारेल छोटा कान्हा ॥

—स्त्री

मित्र आप्त सारे सारे
साथी आहेत सुखाचे
घेती कामें साधुनियां
मध भरलेल्या वाचें ॥

सग्या-सोयऱ्यांचें प्रेम
नाचें कीर्तिलाटावर
जणुं सारे माझ्यासाठीं
करतात उस्तवार ॥

खरा मित्र जीवनांत
फक्त सुदाम्यास लाभे
मनीं येता हा विचार
अश्रू पापणींत उभे ॥

अश्रू मात्र माझ्यासाठीं
गळतात घळघळ
मूक भाषेंतून त्यांची
व्यक्त होते तळमळ ॥

वय सोळावे करूनी गेले, किमया देहावर
लाज ही हंसते गालावर
रसरसलेल्या तुझिया अधरीं दडले कां मधुघट
बोलतां गळतो मधु पटपट
धडधड करते उभार यौवन भीति कसली तुला
ग्रासिते, कळलें सखये मला
कळीं कालची आज हांसली फुलल्या पुष्पापरी
भ्रमर हे गुंजतात भिरिभिरी।
" बहर ज्वानीला आला पुरता, कशी मना सांवरूं?
अंतरीं व्याकुळले पांखरूं "
म्हणतेस असें तूं ! कळलें सारें मला
दिवसाही बघसी स्वप्नांचा सोहळा
वीजेपरि व्याकुळ जीव तुझा जाहला
मेघासम कुणि कृष्ण सांवळा येइल ग लवकरी
घेऊनी जाईल ही अस्तुरी !

आठवते कां सखये धुंद श्रावणाची रात
ओल्या तृणपर्णांसह वारा रंगला खेळांत
झर झर गळे वर्षा भिजे शालू धरीत्रीचा
तोंच 'ज्योत्स्ना' डोकावली चांफा हंसे नवतीचा
मस्त मोगरा शहारे आली झुळुक सुगंधी
सुगंधाची धुंदी करी बाहुपाशी दोघां बंदी
लहरतां स्वर्गसुखीं प्राची हंसली खटयाळ
डोळे उघडतां कळे झाली पहांटेची वेळ
हंसलीस खुदकन बहरला पारीजात
प्रेमपुष्पांचा पडला सडा माझ्या हृदयांत

निळ्या गर्द आकाशांत
तुझी माया मावेचना
प्रीती-सागराची खोली
शोधूनियां सांपडेना ॥

कणखर आलिंगनी
स्निग्ध सायीची मृदुता
बाहुपाशी लाभे मना
अतीव सुख-शांतता

जाईजुईचा सुगंध
दाटे तुझ्या सान्निध्यांत
होते विलीन तेव्हां मी
निर्मळ त्या गंगौघांत ॥

— गांवकरी

माझा हाच काय अपराध
जातां वनिं तूं, नाही भेटले तुजला एकांतात
उभार यौवन नटवी काया
आगळीच मज वाटे दुनिया
तोंच ऐकले शब्द विषारी, झाला वज्राघात ॥
दिव्याभरणें दिली झुगारून
व्याकुळलें मन, रडते स्फुंदुन
कशीं जायचीं चौदा वर्षं ? नाहीं संपत रात ॥
मला वाटलें अधीर होउन
देशिल सखया मज आलिंगन
वक्षीं क्षणभर माथा टेकुन, व्हावें विलीन तुझ्यांत ॥
सदा मिलनक्षण तो आठवुनी
जाइन मनीचें दुःख विसरूनी
हृदयाच्या राउळांत पूजिन, सौमित्रा दिनरात ॥
नव्हती आशा मज कीर्तीची
अभिलाषा नच राज्यसुखाची
माझ्यासाठीं भरूनी यावे, अश्रू तव नयनांत ॥
हाय ! परंतु अभागिनी मी
नाहीं दर्शन, तुझी कोण मी ?
जगात कीर्ती तुझी वाढुं दे, जळेन मी विरहांत ॥
उपेक्षितेची करुण कहाणी
कुणी न रचिली त्या रामायणीं
उपेक्षितेचें जीवन जगलें, नसतां मम अपराध ॥

— वाङ्मयशोभा

# कशी सांगू

प्रीत मनांतली सख्या कशी दाखवूं बोलून
गोड झुळुक सुगंधी कशी आणावी बांधून ?

लाजऱ्या या शेवंतीची लाज मनांत दाटली
शब्दफुलांची पाकळी उमलाया संकोचली

गुलाबाचा रंग लाल गालावरी प्रगटला
परी भावसुगंध तो कुणी मनांत कोंडला ?

सांगू कसें सारें तुला सांगू कोणत्या भाषेंत
तूंच वाच लिहिलेलें निळ्या निळ्या नयनांत

कणखर मिठींत मी गेले पुरी भांबावून
स्पर्शांतून कळाले ना ? नको लाजवूं हंसून ।

— वसंत

माझा महाराष्ट्र देश आहे डोंगर-दऱ्यांचा
झाडांमाडांचा नद्यांचा खळाळत्या निर्झरांचा
माझ्या महाराष्ट्र देशीं नाहीं गुलाबाची बाग
परी सुगंध भरला रानफुलीं शिगोशिग
माझ्या महाराष्ट्र देशीं गोदा तापी यांचा वास
संतभूमी आहे माझा पवित्र नि त्यागी देश
माझ्या महाराष्ट्र देशी 'अरे तुरे' चीच भाषा
करी आदर सत्कार जरी घांस भाकरीचा
माझा महाराष्ट्र देश आहे भोळा नि भावडा
दिला शब्द पाळी येथे गडी राकट रांगडा
माझा महाराष्ट्र देश नाहीं सौंदर्याची खाण
कणखर नेतृत्वाची नाहीं परी येथें वाण
माझ्या महाराष्ट्र देशा नेता लाभे 'यशवंत'
प्रगतीच्या पथावर देश होवो यशवंत

—वार्ता

देवा तुझ्या साम्राज्याचा नाहीं मनाला हव्यास
मला आवडे हें जग हीच धरा नि आकाश
देवा तुझ्या साम्राज्यांत सदा सुखाची पर्वणी
माझ्या जगीं सुखानेंही कधीं ओलावे पापणी
देवा तुझ्या साम्राज्यांत सदा वसंत बहार
नाहीं हेमंत नि वर्षा नाहीं बोचरा शिशिर
देवा तुझ्या साम्राज्यांत सर्व ठायीं देवपण
अशा मृगजला मागें धांवे मानवी जीवन
देवा तुझ्या साम्राज्यांत नाहीं कोणा कांहीं कमी
त्याग दुःखाच्या सागरीं मला लाभे सौख्य नामी
देवा तुझ्या साम्राज्यांत सदा मीलनाची रात्र
कशी कोठून ऐकावी विरहाची हांक आर्त
देवा तुझा सदाचाच कल्पवृक्षाखालीं वास
मला वाटे माझ्या जगीं तूंच मला भेटावास

— वाङ्मयशोभा

नको सूनबाई त्याला नको उगाच रागावूं
काळ्या पापण्यांच्या कडा नको अश्रूंनी भिजवूं
नको शिकवूस त्याला स्वच्छतेचा डामडौल
मोठा झाल्यावर काय सांग मातीशीं खेळेल ?
बोल बोबडे बोलूं दे गोडी त्यांत अमृताची
स्पष्ट बोलेल ग रेषा ओलांडता शैशवाची
हास्य कृत्रिम सभ्यता हवी कशाला राजाला ?
त्याच्या खऱ्या रुसण्यांत आहे गोडवा निराळा
नको हांकलून देऊं त्याच्या गरीब मित्रांना
समतेच्या जगांत आज वावरे चिमणा
शिंपा, शंख, माती, फुलें याचे त्याला आकर्षण
सोने , रुपे, पैसे यांचें नाहीं चिमणें जीवन
आज होऊंदे बाळाला निसर्गाशीं समरस
त्याच्या रुपानेंच घरीं वावरतो जगदीश

— वसंत

भाग्यवान मी आज लागले चरण तुझे देवा
पावन झालें चरणधूलिने घननीळा राघवा ॥
पतिरूपानें इंद्र पातला
कलंकिता मज करूनी गेला
अपराध मला नकळत घडला, देवांच्या देवा ॥
"द्या नाथा मज उःशाप तरी"
दयाशील पती झाले अंतरीं
म्हणती तुजला पदस्पर्श त्या रामाचा व्हावा ॥
तेव्हांपासून वाट पाहते
पाषाणी डोळ्यांतुन बघते
एक मागते, तव चरणांची लाभावी सेवा ॥

— गांवकर

श्रावणांतली रात्र आठवे
रातराणिपरि फुललें मन्मन
नाजुक कोमल मस्त सुगंधी
प्रीती हंसतां, फुललें जीवन ॥

रिम झिम रिम झिम नाचे वर्षा
सप्तरंग हे कुणी उधळले ?
त्यांतच फुलला धुंद मोगरा
लज्जा हंसुनी कांहीं बोले ॥

लगट करितसे पदरापाशीं
गार बोंचरा पहांटवारा
तव स्पर्शाचा येतां आठव
तनुवरि फुलला गोड शहारा ॥

दोघे आपण, एकजीव पण
दूर आज तूं माझ्यापासुन
तुझ्या स्मृतीची ऊब अंतरा
मिळता गळते, माझे मीपण

— स्त्री

# बदली

झाली बदली म्हणून घर सोडून जातांना
अनामिक हुरहुर काय होतसे कळेना
कणाकणाशीं घराच्या जाहलें मी एकजीव
माझें माझें म्हणुनीया ओतला मी सारा जीव
फार आत्मीयता वाटे अंधारातल्या माजघरीं
पाश कोमल गुंतले घरादारांत बाहेरीं
किती लावियेलीं झाडें जाई जुई मोगऱ्याचीं
फुलारली पानोंपानीं कळी आज जास्वंदीचीं
झाड लिंबाचें अजून आहे खोड्याळखट्याळ
मुग्ध तारुण्यांत हांसे माझी सायलीची वेल
सारें सोडून जायचें दूर दूर कोठेतरी
नेत्र येतात भरून कळ बोंचते अंतरीं
भरलेल्या डोळ्यांपुढें दिसे आयुष्याची वेल
सरे बाल्य नि तारुण्य कधीं थांबतो कां काल !
प्रेम सौख्य सागरांत न्हाता रंगलें संसारीं
येतां निमंत्रण त्याचें सर्व राहील भूवरीं
वाटे सोडावी आसक्ती साऱ्या नश्वर जगाची
परी भरल्या नयनीं छाया पडे आसक्तीची

—वाङ्मय शोभा

९५५६८
क्र. क्र.

नव्या नवतीचें लेणें लेवुनियां अंगावर
आली परस दारांत लाजे लाजरी ही पोर।
नववधू परी हिचें होतां आगमन घरीं
लक्ष्मी आली म्हणतात जपतात हिला सारी।
घाली हिरव्या मायेची घरादाराला पांखर
कधीं कोमल नेत्रींचें अश्रू झेली हळूवार।
शालू पोपटी रेशमी शोभे नितल कांतीला
आला वसंत बहार सुकुमार लावण्याला।
कधीं नाहीं दिसायचें कुणा हिचें अंतरंग
वस्त्रें असंख्य नेसवी तिला प्रेमानें श्रीरंग।
पतिव्रता द्रौपदीची आहे सख्खी ही बहीण
हात लागतां दुष्टांचे गाळी अश्रूच दुःखानं।
जीवापाड जपतसे एकुलत्या तान्हुल्याला
नेतां ओढून बाळाला टाकी अंग धरणीला।

— अनुराधा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८३६३२ दि: ...
क्रमांक ...२०३० नोंद दि: ...

## रुसवा

रुसून बसलें मी सौधावर
राग आणुनी लटका गालीं
लबाड दृष्टी फितुर होउनी
उत्सुकतेनें त्यास न्यहाळी ॥

अबोल झालें, गंभीर झालें
पद्‌रहि धरला दाबुनि अधरीं
हाय ! परंतु हास्य मुलायम
गोड रक्तिमा गालीं पसरी ॥

कठोर निष्ठुर केलें मानस
नाहीं झालें विकसित विचलित
काय करूं पण कोमल काया
नेत्रकटाक्षें होई पुलकित ॥

हिरव्या, पिवळया मखमालीवर
दंवबिंदूची होई पखरण
हास्य लाघवी पाहुनि त्यांचे
रागावर हो शीतल सिंचन ॥

कसा दाखवू राग कळेना
श्वास सुगंधी टाकी भारून
आलिंगनीं मी राग विसरलें
अनुरागानें फुललें मन्मन ॥

— वसंत

कशी गाऊं तुझ्यासंगे सांग श्रावणाच्या सरी ?
कशी धुंद होऊ सांग ! दुःख भरलेलें उरीं
उधळीसी दोन्ही हातीं मौक्तिकांचा शुभ्र चुरा
काय करूं तो वेंचून प्राणनाथ नाहीं घरा
गंधारला ओला वारा तुला कवळी मिठींत
शहारसी, लाजसी तूं दूर परी माझा कांत
तुझें मादक सौन्दर्य खुले सोनेरी उन्हांत
तुझें उन्मादक नृत्य करी अधीर मानस
रोज पहाते मी वाट तुझी आणि एकांताची
आज वाटे पण मला रात्र कशी संपायची ?

— वाङ्मय शोभा

# गुपित

थांब जरासा चंद्र म्हणते
शपथ घालते, तुला सांगते
उगाच मजला छेडूं नको
गुपित माझें फोडूं नको ॥

गालावरली लाली खुलली
निळया लोंचनी लज्जा हंसली
बावरलें मन, काया फुलली
कां ? कशी ? जा पुसूं नको ॥

लताकुंज तो मादक हिरवा
वेणीमधला गळला मरवा
ओठावरली लाली टिपली
कुणी ? कधीं ? जा हंसू नको ॥

निळ्या प्रांगणीं तूं सत्ताधिश
जा करूनी घे, रोहिणीला वश
लाजविसी कां ? मिस्किल हंसुनी
पाहिलेस तें, सांगू नको ॥

— अनुराधा

भिजे वर्षावांत धरा
झाली तृप्त आणि शांत
चढे नव्या नव्हाळीला
तेज आगळें प्रशांत ॥

प्रीती सरीता जाहली
शांत आणखी गंभीर
गर्द हिरव्या पदरा
झोंबे खट्याळ समीर ॥

परी नाहीं बावरली
हंसे, डुले, आनंदानें
फुला कळ्यांच्या कानांत
गीत गोड गुणगुणे ॥

मातृपदाची लागली
चाहूल या धरीत्रीला
नवा अंकूर उदरीं
फळ आलें संसाराला

— स्वतंत्र भारत

# किशोरीस

इंद्रधनूचा पूल रम्य परी कसें त्यावरी चालावें
तुला सांगते ऐक किशोरी कसें त्यावरी वागावें।
सौंदर्याचा रास्त असावा अंतरांत तो अभिमान
अहंकार परि नको तयाचा दिली देणगी देवानं।
सौंदर्याच्या साजाला ग लज्जेची ही साथ हवी
हंसरी कोमल गुलाब कलिका सात्विकतेनें बहरावी।
दंवबिंदूची शुचिर्भूतता, निर्मलता अंतरी असो
मातापितरावरती श्रद्धा, तुझी किशोरी सदा असो।
उत्तानपणा भडकपणा हा वैरी होईल जन्माचा
अल्पवयांतिल प्रेमहि करते ऱ्हास आपुल्या भाग्याचा।
कृत्रिम सौंदर्याचा तुजला नको किशोरी हव्यास
निर्मळ सुन्दर मधुहास्यानें सुगंधीत व्हावा श्वास
नैसर्गिक बट काळीकुरळी सौंदर्याला खुलवील
निरोगी लाली गालावरती तारुण्याला हंसवील।
फुलामुलांचें दुःख पाहुनी अंतर व्हावें व्याकूळ
कौमार्याचें व्रत पवित्र तूं, सर्वांआधी सांभाळ।
पूल संपता इंद्रधनूचा सौख्यरास तुज लाभेल
घे घे उचलुन हवें तुज जे भाग्यहि तुजला सांगेल

—वसंत

वठलेल्या वृक्षा लाभे
वसंताची कृपा दृष्टी
तशी तुझ्यामुळें माझी
बदलली सारी सृष्टी ॥

ग्रीष्मऋतूंत सुगंधी
गार झुळुक झुळावी
माझ्या अंतरास आज
तृप्ती तशी लाभे नवी ॥

सुकलेल्या ओहोळास
वर्षा करी धनवान
तुझ्या नावांत गुंफिता
नांव माझें झालें धन्य ॥

माझ्या एकाकी जीवनीं
झाला सौख्याचा वर्षाव
तुझ्या मादक मिठींत
लाभे स्वर्गीचें वैभव ॥

श्रावणाच्या बाहुपाशी धुंद विसावे पहांट
गुलबक्षी मुलायम मिटले हे मृदु ओठ ।

रातराणीला जाहलें सारी रात्र जागरण
येई सुगंधी हातानें मुखकमला झांकून ।

शृंगारांत गळलेला शुभ्र मोतियांचा हार
फुलाकळ्यांनी जपून ठेवियला वक्षावर ।

विसकटला शृंगार वृक्षलता सांवरती
शालू आवरून घेता मोती खालीं ओघळती ।

पुष्प प्रीतीचें फुलता गंधारला आसमंत
लाली गालीची चोरून हांसे गुलाब डौलांत

प्रियकराच्या स्पर्शानें आलें सौख्य बहरास
स्वप्न होतांच साकार लाली पसरे पूर्वेस

—माहेर

सखे आगळी पौर्णिमा आज झळाळे जीवनीं
यौवनाच्या मृदुस्पर्शें गेली काया बहरोनी ।

सखे लाजरी पौर्णिमा आली चोर पावलांनी
दृष्टीभेटीत पहिल्या गेली हृदया चोरूनी ।

सखे हांसरी पौर्णिमा सूर मंगल वाद्यांचा
स्वर्ग धरेचें मीलन होई वर्षाव प्रेमाचा ।

सखे नाजुक पौर्णिमा टाकी पाऊल जपून
उरी अंकुर वंशाचा लाज सांगते रंगून ।

सखे वत्सल पौर्णिमा भिजे सुखांत, तृप्तींत
बाल चिमणा हांसला माझ्या सुखी संसारांत ।

सखे पवित्र पौर्णिमा स्वप्न करते साकार
स्वर्गसुख लाभे मला हिच्या स्निग्ध अंकावर ।

— गांवकरी

# विरहिणी

गातें मी तुजसाठी गीत गोड राया
स्मृतिगंधें धुंद होई आज माझी काया ॥

अजुनि मला आठवते रात्र श्रावणाची
अजुनि मनीं पालवते आस मीलनाची
मला दिसे चौंहिकडे प्रिया तुझी छाया ॥

रातराणी मोहरतां धुंद होई रात
बहुपाशी मीही धुंद मस्त चांदण्यांत
भासतसे अधरावर अधर ठेवि राया ॥

आज कुठे सख्या तूं, आणि कुठे ती मी ?
दुःख वाटते उरांत बाण घुसे वर्मी
करिते मज व्याकुळ रे सख्या तुझी माया ॥

— अनुराधा

कशाला रे दिला देवा
ठेवा मातृहृदयाचा
कुठवर सोसू सांग
खोल प्रहार शब्दांचा
बुद्धीमत्ता, सत्ता, सौख्य
साऱ्या आहेत मैत्रिणी
तरी वाटते एकाकी
उशी भिजे आंसवांनी ॥
सौंदर्याची देणगी तूं
दिली कशास मजला ?
गळे फूल फलाविना
मिळे स्फुंदत मातीला ॥
मातृपदाविना सारें
व्यर्थ आहे स्त्रीजीवन
बाळकृष्णा धांवत ये
आसुसलें माझें मन !

नको खंत करूं मना
गेले ते जाऊंदे मागें
नेतां शिशिरानें पानें
होती अंकुर रे जागे ॥

फूल गळालें गळूं दे
गळणार केव्हांतरी
फळा जप पण आतां
बीज लपले उदरीं ॥

संध्यारंग मावळले
नको होऊस व्याकूळ
थांब थोडा, धीर धर
पूर्व दिशा उजळेल ॥

विश्वसांखळी महान
जुन्यांतून जन्म नवा
नव्या युगाचें स्वागत
करण्यास सिद्ध रहा ॥

— नवनीत

काळ्याभोर नयनांत
नको रेखूस काजळ
तुझ्या एका कटाक्षानें
झाला शिकारी घायाळ ॥

रसरसलें तारुण्य
त्यांत रंगे ओठीं विडा
लाल मदीरा पाहून
झिंगलों मी झालों वेडा ॥

पुन्हां पुन्हां सांवरून
घेसी उगा पदरास
येतो आगळा उठाव
यौवनाच्या दौलतीस ॥

मस्त केवडा सुगंधी
दरवळे कोशपाशी
नागापरी झालों धुंद
अडकलों प्रेमपाशीं ।

जरा चाल ना जपून
नको होऊस निष्ठुर
प्रेमवेड्या हृदयानें
कसा धरावा ग धीर ?

कां आलिस तूं कुंती माते?
कशास म्हणसी पुत्र मला ग
कशास दाविसी प्रलोभनातें
कां आलिस तूं कुंती माते! ॥
कसा म्हणू मी 'आई' तुजला
जन्मतांच त्यागिलेस मजला
सूतपुत्र म्हणुनी जन्म काढिला
सोशियलें अति अपमानाते ॥
अर्जुनापरी मीहि धर्नुधर
होतो 'पण' जिंकाया आतुर
'सूतपुत्र हा' हिणविति भूसुर
तेव्हां कां नच वदलीस यातें ॥
मीठ खाऊनी ज्याचें जगतों
त्यास्तव मरुंदे इच्छा करतों
म्हणुनि आतां तुला विनवितों
नको करूं ग व्यथित मनातें ॥
तरीही देतो वचन तुला मी
फक्त अर्जुनासवें रणांगणीं
लढेन! पडला दोघांतुन कुणी
उरतील पांडव पांच तुला ते ॥

— वाङ्मयशोभा

पौर्णिमेचा चंद्र हांसे स्निग्ध शांत निळ्या नभीं
माझी चंद्रकोर येथें चांदण्यांत न्हात उभी।
पूर्णचंद्र दावी जगा सौंदर्याचा साक्षात्कार
त्याच लोभस मोहक सौंदर्यास ये आकार।
दुडुदुडु धांवतांना पायी वाजती पैंजण
काळ्या कुरळ्या बटांत नाचे गुलाब सपर्ण।
आज अश्विनी म्हणून शुभ्र वेष केला नवा
मृदु निष्पाप शैशवा कशाला हा थाट हवा।
आटवलें दूध वास दरवळे केशराचा
तुझ्या सुगंधी श्वासानें पट रंगे संसाराचा
दूध पितां आलें हंसू गालावर खुदकन्
थेंब ओघळतां खालीं चंद्र थांबे लोभावून।
ओवाळतां आनंदानें टाळ्या वाजविसी पोरी
वाटे सौख्य बरसात झाली आज माझ्या घरीं।
काय देऊं आशीर्वाद मांगल्याचा मंगलेला
तूंच अश्विनी पुनव आशावेल अंकुरला।
हास्य असेंच फुलुं दे जन्मभरी ओठावर
समृद्धीच्या चांदण्यांत भिजो तुझें घरदार।

— स्त्री

# आई

कां ग नाहीं बोलत तूं? नको राहूं अशी मुकी
कशी सोडूनी गेलीस आज मला तूं एकाकी
फिरव ना तुझा हात एकदांच अंगावरी
क्षणभर चाखूं दे ना स्पर्शसुखाची माधुरी
कोण करील कौतुक? आतां माझ्या श्रेयसाचें
कोण होईल व्याकूळ? दुःख जाणुन मनाचें
कोण पाहील ग आतां वाट माझ्याच येण्याची?
कोणा लागेल उत्कंठा? आतां माझ्या खुशालीची!
वाकूं आतां कोणापुढें करावया नमस्कार?
आशीर्वाद प्रेमभरें कोण आतां उच्चारील?।
अश्रूभरल्या नेत्रांना दिसे तुझी प्रेममूर्ती
ये ना अश्रू पुसावया हांका तरी मारूं किती?।

वसंताच्या सान्निध्यांत शृंगारांत भिजलेली
रात्र पहिली सुगंधी अंतरांत कोरलेली।

रात राणीची नाजुक मुग्ध लाजरी सोबत
घेऊनीयां आलीस तूं, पैंजणांच्या झंकारांत।

गातो मुग्ध प्रणयाचें गीत गंधारला वारा
प्रीतिरसांत भिजला होता आसमंत सारा।

धुंद करीत शर्वरी हंसे फुलतां बहर
उरीं रुतला ग खोल मदनाचा तीव्र शर।

थरथरत्या कायेचा स्पर्श आठवे अजून
जिंकलेस त्याच क्षणीं स्वतः शरण येऊन।

सोडुनीयां घरट्याची मऊ मखमली ऊब
घेई झेंप आकाशांत वाढवी रे तुझा वेग
पंख फुटतां पांखरा काय जरूर उबेची
ओढ लागलीसे मना पुढें पुढेंच जाण्याची
शिकवलें सारें आतां कसें उडावें, लढावें
धोका कसा ओळखावा ? कसें अन्न मिळवावे
पिंजऱ्यतांले वैभव घेण्या नको बनूं कैदी
नको श्रमाविना खाऊ, नको बनूं बाळा ऐदी
जिद्द ठेवी मनामध्यें आकाशाला भिडण्याची
ठेव तयारी पंखांत सागरास लंघण्याची
नको वळून बघूंस पुढें जातांना माघारी
देतां निरोप दाटल्या नयनांत अश्रूसरी
क्षणभर जरी मागें वळूनीयां बघशील
अश्रूसर कोंसळेल पाय मायेंत गुंतेल
आशीर्वाद पाठीराखा माझा राहिल सदैव
देवो साथ जन्मभरी तुला लाडक्या सुदैव

## विसर

आवर हे दुःखाचे
अनावर कढ
पूर्वेकडे जरा बघ
फुटे कांचनाची कड ॥

उदासवाणे मन
ठेव जरा दूर
कोंवळे नाजुक ऊन
घे मजेंत अंगावर ॥

दंव झाडून झाली
कळी पुन्हां हुशार
गंधवेडा वारा
शीळ घाली खुशाल ॥

दुःखामागून सुख
न्याय नियतीचा
विसर अशुभ रात्र
हाच मार्ग सुखाचा ॥

नको यावया पूर्ण चंद्रमा
नको चांदणें शुभ्र मुलायम
तूं मी दोघे असतां जवळीं
अंधारात ही फुलेल पूनम् ॥

अधरावरती अधर टेकतां
अंधारही होईल सुगंधी
प्रणयाच्या विश्वांत विरघळे
अंतरांतली मादक धुंदी ॥

गुपित कळतां हृदयामधलें
सप्तसूर ते गीत गुंफतिल
सरेल नकळत बघतां बघतां
तुझ्या नि माझ्या मधले अंतर ॥

## कसें सांगू ?

मी कुठें आहे ? कसें सांगू ?
कुठें नाहीं ? तेंच विचारा !
पाहिलांत का रंग उषेचा ?
घेतलात का विंझण-वारा ?
अथांग सागरांत डोकावून
खजिना कधीं पाहिलात का ?
अंतराळांत भ्रमण करून
ग्रहताऱ्यांशीं बोललात का ?
सप्तरंगाच्या स्वर्गंगेंत
गेलांत का कधीं भिजून
सप्तसुरांच्या मैफलीत
रंगलात का बेहोष होऊन ?
सच्च्या मानवाच्या मनांत
शिरलांत का एकदां तरी ?
मग तुमची माझी भेट
व्हावी कशी ? सांगा तरी ?

— गांवकरी

पौर्णिमेच्या चांदण्यांत
न्हालें सारें आसमंत
शैल शिखरें हंसली
आपुल्याच दिमाखांत ॥

राणी रोहीणी लाजली
घेतां जवळ ओढून
शुभ्र ढगांची ओढणी
ओढी हलक्या हातानं ॥

क्षितीजाच्या एकांतात
चुंबे आकाश धरेला
लता नाजुक कोमल
वृक्षवक्षीं विसांवल्या ॥

अश्या मंगल वेळेला
पावा घुमावा मंजुळ
माझा प्रियसखा कृष्ण
वाटे असावा जवळ ॥

— स्वतंत्र भारत

चिमणा राजा हंसतो तेव्हां
हास्य तुझें पाहते ॥

इवले इवले ओठ सानुले
अमृत पिऊनी तृप्त जाहले
थेंब ओघळे गालावरूनी
"परब्रम्ह" वाटते ॥

काजळ काळ्या नेत्रीं इवल्या
सौख्य रसाचा सागर भरला
आनंदाश्रू नयनीं भरतां
गंगा मज भेटते ॥

तुझ्यापरी रे निर्मळ अंतर
प्रीती याची चराचरावर
उरी कवळुनी धरतां याला
भेट तुझी लाभते ॥

— अनुराधा

# झरा

झरा वाहतो सुरेख  हिरव्या या रानांतून
धडे समतेचे घ्यावे  याच्या पायाशीं बसून
रूप साजिरें गोजिरें  परी नाहीं गर्व त्याचा
कुणी निंदा, कुणी वंदा  कधीं राग ना यायचा
जातां जातां उधळीतो  संपत्ती ही तुषारांची!
झाडापानांना लाभते  ऊब याच्या ऐश्वर्याची
जिथें जातो तेथें आणी  समृद्धीला बोलावून
होतां आगमन याचें  जाई दुष्काळ पळून
झुळझुळ गातो झरा  परमेशा आळवीत
नाहीं खंड कधीं त्यांत  देव भरे जीवनांत
हिंस्त्र पशू वा मानव  येवो तान्हेलेला कोणी
समतेनें वागेल हा  देई सर्वांनाच पाणी
झरा नव्हे, परमेश  मला दिसतो झऱ्यांत
त्याच्याजवळ जातांच  लाभे अवीट अमृत

—शिशुरंजन

# भिल्लीण

डोईवरूनी आणली पहा मोळी भरगच्च
पाऊल पुढती पडे न म्हणते 'थांब जराशीच'
वेळ कुठें परी विश्रांतीला, परत जावयाचें
मोळी विकुनी पैसे येतां, धान्य घ्यावयाचें
काळी तरीही रेखिव सुंदर, बांधा शेलाटी
कमरेला करकचुनी बांधते, रंगित चिंधोटी
पदरापरि पांघरून घेई फडकें अंगावर
भिल्लीण चाले झपझप आतां होईल अंधार
कोणी म्हणती शिका लिहाया, शिका नविन गोष्टी
ऐकून घेते सारें, होते मनांत ती कष्टी
पडल्या पडल्या रात्रीं म्हणते वेळ आणुं कोठुन
घरबसल्या मज घांस आणुनी देईल कां कोण ?

## ते सुवर्णक्षण

तुझ्या चिंतनी जागे शर्वरी
सोबत करतो ओला वारा
मस्त सुगंधी वादळते मन
नकळत गळती अश्रूधारा ॥

गार बोचरा खट्याळ वारा
जातो मजला हलके स्पर्शुन
शहारते मी अंगोपांगी
मिठींतली तव ऊब आठवुन ॥

रातराणी ही हंसता मादक
धुंद मोगरा वाजवितो शीळ
स्वप्न रंगते स्वर्गसुखाचें
सखया होते असीम व्याकुळ ॥

स्मृतींतले ते सुवर्णक्षण रे
मला बिलगती अधीर होऊन
नसेल तुजला माहीत पण मी
तुझ्यांत जाते विलीन होऊन ॥

## का म्हणूं

नका म्हणूं सासूबाई
नाहीं माहेरची रीत
जें जें चुकेल तें माझें
नका निंदू माझें गोत ॥

नका देऊं अलंकार
घालायास भराभर
शब्द प्रेमाचा लाभावा
आहे परक्याची पोर ॥

नको घांस पक्वान्नांचा
नको बुट्टेदार शालू
जीवनाची वेल फुलो
प्रेमसिंचनानें हळूं ॥

आहे परक्याची पण
आतां याच घरांतली
लेकीसारखी होईन
तुम्ही म्हणतां आपुली ॥

संध्याताई संध्याताई शाळेला आज तुम्ही
जाणार काय हो? जाणार काय! ॥
नवा नवा फ्रॉक, दिसतो मोठा झक्क
नायलॉनची रिबन तुम्ही
लावलीत काय हो? लावलीत काय! ॥
स्नो लावलांत काय? पावडर लावलीत काय
गोरी गोरी परी छान
बनलांत काय हो? बनलात काय! ॥
दिसतां किती छान? इकडे करा कान
नवे नवे डूल तुम्ही
घातलेत काय हो? घातलेत काय! ॥
बूट मोजे घालून ऐटी सारी करून
फुलें केसांत माळुन आतां
निघालांत काय हो? निघालांत काय!
मोठ्या झालांत म्हणुन, जातां काय पळुन
गोड गोड पापा मला
देणार काय हो? देणार काय! ॥

—शिशुरंजन

लज्जा गालीं हंसुनी सांगते
उद्यां पहाशिल स्वर्ग भूवरी
चंद्राला तू वेडे म्हणशील
इतक्यांत कशी संपली शर्वरी ॥

सप्तपदीतुनी शतजन्माची
ओळख पटली कोमल हृदया
ओझरत्या स्पर्शानें फुलली
नवतीची तव नाजुक काया ॥

हिरव्या मखमली शालूवर
हिरवा सारा साज तो खुले
मुग्ध मधुर तव स्मितहास्यांतिल
भाव लाजरे मला उमगले ।

नाहीं केले भजन मी नाहीं वाजविले टाळ
नाहीं केले जपजाप्य नाहीं ओढली मी माळ
नाहीं केली पूजाअर्चा नाहीं भस्म चार्चियलें
नाहीं थाट नैवेद्याचा नाहीं कांहीं मागितलें
माझा देव्हारा आगळा माझी पुजाही निराळी
संसाराच्या देव्हाऱ्यांत फूलवात उजळली।
मीठ भाकरीचा घांस गोड मानुन रांधिला
समाधानाचा कापूर देवापुढें मी लावला।
वडिलांची सेवा हीच देवपूजा मानियली
पतिदेव हीच मूर्ती अंतरात पूजीयली।
बालब्रम्ह आले घरीं असें ओठांत अमृत
मिळे प्रसाद देवाचा स्वर्ग लाभला घरांत।

खा ना विठूराया भाकरीचा घांस
स्तब्ध उभा कां रे, कां रागावलास?
चंद्रभागेमध्यें केली मी अंघोळ
हातपाय तोंड धुतलें निर्मळ।
बाबांपरी मीही सारी पूजा केली
गंध अक्षता नि वात उजळली।
फुलें सुवासिक आणली तोडून
केली मी सुरेख माळ बघ छान
सारें सारें केलें मग ये ना आतां
एक घांस मुखीं घाल भगवंता
बाबा म्हणतील विठ्ठल उपाशी
राहिला रे नाम्या मारतील मशी।
नाहीं ना ऐकत फाडतों मी माथा
जेव लवकर पंढरीच्या नाथा।
देव घाबरला निश्चय पाहून
जेवी भराभर साकार होऊन।
नामा दंग झाला जगा विसरला
म्हणे विठूराया मघा कां रुसला?
नाहीं रुसलो रे वेड्या नामदेवा
घालतां रे तुम्ही मला प्रेमवेड्या
भावभक्तीवरी असे माझा जीव
म्हणून जेवलों लक्षांत ठेव
मार्ग हाच सोपा सांग जगताला
माझा होतो तोंच आवडतो मला

— शिक्षण-पत्रिका

कुठें तरी ठेवा श्रद्धा   नका म्हणूं देव नाहीं
जराचर सृष्टीमध्यें   कुठें ना कुठें तो राही ॥

पुंडलिके ठेवियेली   श्रद्धा मातापित्यापायीं
चतुर्भूज देव आले   बोलण्यास वेळ नाहीं
देव जाहला संतुष्ट   विटेवरी उभा राही
सेवा पावली देवाला   गौरवून स्वर्गीं नेई ॥

एकवचनी हो श्रद्धा   सांवळ्या प्रभू रामाची
त्यागी राज्य, जाई वना   साथ त्यास जानकीची
दीगंतरी झाली कीर्ति   राम झाले देवरुप
श्रद्धेविना जीवनास   नसे अर्थ, रंगरुप ॥

सत्य हाच देव मानी   होई हरिश्चंद्र थोर
विकूनी स्वतःला घेई   विके पोटचाही पोर
घेतली परीक्षा त्याची   झाले ऋषी पराजीत
झाला विजय सत्याचा   त्रैलोक्य बुडे हर्षांत ॥

तुकाराम साधा वाणी   श्रद्धा भक्तिवरी ठेवी
संसारात राहूनीयां   पांडुरंगास आळवी
तुका झाला संतश्रेष्ठ   जगीं झाली कीर्ति त्याची
कुळा उद्धरीले त्यानें   अशी महती श्रद्धेची

श्रद्धा ठेवा सेवेवरी सेवा करा निष्कलंक
राग लोभ सोडा ठेवा सदा मनांत विवेक
कृतज्ञतेच्या आंसूंनी नेत्र येतील भरून
तेथें पहा डोकावून दिसेल तो नारायण ॥

माना एक शक्ति थोर नका म्हणूं देव त्याला
कसेंही भजा हो त्यास सर्व पावते देवाला
असल्यास श्रद्धा होतो सामान्याही असामान्य
देशप्रेमावर श्रद्धा झाला बाळ लोकमान्य

—शिशुरंजन

शिवनेरीचा फत्तर म्हणतो—

मज म्हणा क्षूद्र तुम्हि फत्तर शिवनेरीचा
परी सच्चा पाइक मीच असे राष्ट्राचा ॥ धृ० ॥

जरी दिसलों आतां वृद्ध आणखी जीर्ण
मज भोंवतीं केवळ शुष्क वाळके पर्ण
परी ताठ अंतरीं कधीं न वाकायाचा ॥

मम कुशींत प्रभुनें जन्म घेतला जेव्हां
मी भाग्यवंत या त्रिभुवनीं ठरलों तेव्हां
मजवरी अनुग्रह झालासे दैवीचा ॥

ते चरण चालले दुडुदुडु माझ्यावरती
त्या चरणांची मी शिरी झेलली माती
मज मोल लाभलें स्पर्शें पावन त्यांच्या ॥

त्या बालशिवाजीसवे खेळ खेळलों
लुटुपुटुची लढाई दादोजीसह हरलों
मी गोष्टी ऐकल्या रामकृष्ण भरताच्या ॥

तो शिवनेरीचा लाल जाहला राजा
मी सुखावलों जणुं गौरव झाला माझा
मी पहिला केला मुजरा त्या मानाचा ॥

त्या शत्रुरक्ता पिऊनी झालों पुष्ट
मी गरिबा रक्षुनी नष्टच केले दुष्ट
मी होतों तेव्हां कणखर पोलादाचा ॥

ते निशाण चढलें नभांत झरझर वरती
त्या काळाचीही कधीं न शिवली भीति
त्या निशाणापुढें झुकला चंद्रहि वरचा ॥

तें चढतें वैभव डोळ्यांनी पाहिलें
मी हाल साहिले पारतंत्र्य सोशिले
परवशाती रडला कणकण या शरिराचा ॥

परी नरव्याघ्राची गर्जना मी ऐकली
हा भारत माझा घोषणाही ऐकली
त्याक्षणीं जाहलों ऋणी "बाल-टिळकांचा" ॥

मी गांधीजींचें 'सत्याग्रह' पाहिले
अन् 'जवाहराचें' शौर्य धैर्य पाहिलें
तो असीम त्यागहि देखियला राष्ट्राचा ॥

त्या परकीयांना "चले जाव" सांगता
मी मनीं हर्षलों, पाहुन जागृत जनता
अन् उगवला पुढें भास्कर स्वातंत्र्याचा ॥

शिवप्रभू कृपेनें सुदीन मजला दिसला
हा गोड सोहळा शिवनेरीवर घडला
मजवरती झाला वर्षावच पुष्पांचा ॥

मज "यशवंता"नें दिधला पहिला मान
मम भव्य स्वप्नही इथेंच झालें पूर्ण
'यशवंत सदा व्हा' वदली माझी वाचा ॥

मी झालों आतां धन्य आणि पावन
त्या अनंतांत मी हर्षें होइन विलीन
मी निरोप आतां घेतों हो सर्वांचा ॥

स्वातंत्र्याची गगनभेदी ही दुमदुमली ललकार
जय भारत, जय हिंद असा हो चाले जयजयकार ॥

भारत-भूच्या मुकुटामधला पांचू हिरा पळवुनी
पोर्तुगीज ते बसले होते उरीं त्या कवटाळुनी ।
आमुचा गोवा आम्हां परत द्या म्हणतां देती नकार
अपुल्याच घरीं तेथील जनता बेकार नि लाचार ॥

चौदा वर्षं सहनशीलता भारत-राम-धरी
गोवा-सीता रडते धरुनी राम प्रतिमा उरी
राम सांगतो प्रेमानें त्या सोडावे अधिकार
नको व्हावया रक्तपात तो व्हा तुम्ही दिलदार ॥

पटले नाहीं परंतु त्यांना शांति-दूत हरले
शस्त्रबलानें भारत-भूनें गोवा जिंकियलें
नाहीं जाहला कुठेंहि त्यांना जोराचा प्रतिकार
जनता गाते मातृभूमीच्या आनंदें जयकार ॥

शरणागत जो अभय त्याजला संस्कृतीच अमुची
'नेहरु' म्हणती भारत राखिल बाजू न्यायाची
पोर्तुगीज हे शत्रु न अमुचे वैर न मनि धरणार
शांतीसाठीं भारत माझा सदैव हा झटणार
तिरंगी झेंडा ऊंच फडकतो आतां गोव्यांत
सारी जनता निर्धास्त अतां मातेच्या कुशींत
युगायुगाचें स्वप्न जाहलें गोव्याचें साकार
जय भारत जय हिंद असा हो चाले जयजयकार ॥

—वात

जीवनाचें दर्शन, तुझ्या रुपांत घडते आहे
बा प्लॅटफॉर्मा, तुझी थोरवी अगाध आहे॥

जगणारे जीव-घाईघाईनें येथें येतात
माझें माझें म्हणून सामान गोळा करतात
जात गोत वय विसरून धांवपळ करतात
प्रगतीची गाडी पकडायला धांवतात, धडपडतात
कुणी सबलाचा आधार घेऊन पुढें जातो
कुणीं भाग्यवंत दैवयोगानें आरामांत बसतो
कुणा गरजू माणसाला मात्र मागें रहावें लागतें आहे
बा प्लॅटफॉर्मा, तुझी थोरवी अगाध आहे॥

प्रेमानें थबथबलेली नजर येथें अश्रू गाळते
क्रोधानें थरथरणारें मन, येथें अंगार ओकते
कुणी सुखावतें, कुणी व्याकुळतें, कुणी लुटलें जातें
कुणी नौकरीसाठीं, कुणी छोकरीसाठीं, कुणी चैनीसाठीं
येथें गर्दी करतो आहे, कुणी निष्पाप चेंगरतो आहे
बा प्लॅटफॉर्मा, तुझी थोरवी अगाध आहे॥

चहा कॉफी दूध घ्या कुणी ओरडून सांगतो
भजी-वडा-चिवडा घ्या कुणी आवर्जुन सांगतो
कुणी शिळी पुरी-भाजी ताजी म्हणून विकतो
जगाला फसवून स्वतःचा स्वार्थ साधून घेतो
एक आदर्श व्यक्ति बनतो, मोठा होतो
न बोलणाऱ्याचीं गोड द्राक्षें सडून जात आहेत
बा प्लॅटफॉर्मा, तुझी थोरवी अगाध आहे॥

या सर्वांना अंगावर खेळूं देणारा प्लॅटफॉर्म
स्थितप्रज्ञासारखा शांत, स्थिर उभा असतो
सर्वांना सारख्याच प्रेमानें कुशींत ओढून घेतो
संधीची गाडी येतांच येथें दंगा उसळतो
लायक नसणारे प्रगती पथावर चालूं लागतात
कुणी गुणवंत संधी चुकल्यामुळें हळहळतात
पाय मोडून हात जोडून उदास बसतात
काळोखाच्या पांघरुणांत सर्वांना गुरफटून घेत
प्लॅटफॉर्म त्यांना समजावतो आहे
आजची गाडी चुकली ? चुकु द्या ! उद्यां परत येईल
असा धीर देत अंगाई गीत गातो आहे
बा प्लॅटफॉर्मा तुझी थोरवी अगाध आहे

# तोल

खालीं झुके आकाश
दूर क्षितिजाकडे
धरणी गेली लाजून
लाली पूर्वेकडे ॥

मार्ग चालतां अनोखा
अशा पहांटेला
अडखळतें पाऊल
हंसे रातराणी मला ॥

फिरे गंधवेडा वारा
प्रीतीसुगंध लेवून
त्याच्या स्पर्शानें शहारें
बावरें हे मन ॥

धुंद झाली माझी काया
तुला पाहतां दुरून
तोल जाईलसे वाटतें
घे राया सांवरून ॥

तें माझें घर आहे, माझेंच आहे
एक लहानशी खोली आहे, आंत अडगळ आहे
सूर्यप्रकाश आंत येत नाहीं, आंत येण्याला घाबरतो
सुंदर चंद्रमा स्वतःला सांवरत पळून जातो
चंद्र दिसत नाहीं, भावना फुलत नाहींत
पौर्णिमा प्रकाशत नाहीं, प्रणयाला रंग चढत नाहीं
प्रणयांत दांडगटपणा नाहीं, रानवटपणा नाहीं,
जबरदस्ती नाहीं आणि म्हणूनच जीवनांत मस्ती नाहीं
याला कारण काय? तर जागा नाहीं-जागा नाहीं
कधीं वाटतें परीचे पंख लावून भरारी मारावी
ओल्या मातीचा सुगंध उधळीत पहांट फुलावी
दंवात भिजलेला ओला वारा अंगावर घ्यावा
हिरवळीच्या मखमालीवर देह लोटून द्यावा.
नक्षत्रांचीं फुलें तोडून केसांत माळावीं
प्रियकराबरोबर प्रीतही माझ्यावर भाळावी
पण... पण...

पहांट होतांच नळ म्हणतो उठा उठा
पाणी जाईल, धुणें राहील, झटपट उठा
घड्याळासारखेच रुक्ष जीवन सुरू होतें.

माझ्या छातींत मात्र उगाच धडधडतें
माझें काळीज धडपडतें, चडफडतें, फडफडतें
पण जागच्या जागींच, नि सुरू होतें जीवनाचें
बेसूर संगीत—तरीही—
भराऱ्या मारणारें मन थकून भागून घरींच येतें.
दबकत येतें, थबकत येतें, आडोशाला उभें रहाते
कारण! याच टीचभर घरांत मायेची ऊब आहे
प्रीतीचें गूज आहे, वात्सल्याची कुजबुज आहे
येथेंच माझें व्यक्तिमत्व आहे, जीवनाचें सत्व आहे
संसाराचें तत्त्व आहे, सारें ममत्व आहे
घरापासून दूर दूर उडून जावें असें वाटतें
पण थकलेलें मन विश्रांतीसाठीं मागें झेंप घेतें
कारण हें घर आहे, माझें घर आहे
आणि म्हणूनच फार सुंदर आहे

नाजुक गुलाबी
गाल मखमली
इवली जिवणी
हंसे फुलापरी ॥

डोळे भिरीभिरी
शोधतात कांही
सांपडलें हवें तें ?
समजलें नाहीं ॥

जादू ही अनोखी
यौवनानें केली
समजेना मना
कळी कां फुलली ? ॥

टक लावूनीयां
बघतांच कोणी
नकळत खालीं
वळतें पापणी ॥

## लबाड डोळे

चांदण्याची शीतलता
आज मजला कळली
मुलामय स्पर्शांत
मादकता भरली ॥

रातराणीच्या फुलांत
सुगंध भरला नवा
चांफा हंसून सांगतो
एकांत हवा हवा ॥

लाजून पळतेस दूर
डोळे तरी बोलतात
'नको नको' म्हणतेस
हवें असें सांगतात ॥

खेळ संपला आवरा
जीवनांतील पसारा
वेळ जाईल निघून
संपेल शिडाचा वारा ॥

गुंडाळा गोड रेशमी
स्मृती ओल्या केसांत
नको कळ हृदयांत
नका गुंतू पाशांत ॥

जग तुमचें निराळें
जडलेलीं नातीं तोडा
दृष्टी टाका पैलतीरीं
कोणी असेल खडा ॥

# अति तेथें माती

सौंदर्याचा अतिरेक सीतामाईला भोंवला
घडे रामायण सारें श्रेष्ठोत्तम दुरावला ॥

औदार्याचा अतिरेक करी धनुर्धर कर्ण
देतां कवच कुंडले गेले सोडुनीयां प्राण ॥

सत्याचाच अतिरेक करी हरीश्चंद्र राजा
स्वप्नांतलें देतां दान विके पुत्र, जाया, प्रजा ॥

अति द्यूत खेळुनीया नल राजा पस्तावला
अर्ध्या वस्त्रावरी सोडी सुकुमार अर्धांगीला ॥

अति गर्वानें रावण भावभक्ती विसरला
वैर करतां प्रभूशीं पार रसातळा गेला ॥

ज्ञानदीपानें उजळे संसार हा मानवाचा
परी अतिज्ञानानेंच नाश होईल धरेचा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

पारीजातक फुलला बहरला पापोंपानीं
फूल नाजूक, सुंदर शहारतें मनोमनीं ॥

आणी सांवळा श्रीकृष्ण स्वर्गांतून हेंच फूल
सत्यभामेच्या मनाला यानें पाडली ग भूल ॥

झाड सत्यभामें दारीं फुलें रुक्मिणीच्या दारीं
खरें प्रेम-भक्ती मला ओढे सांगतो मुरारी ॥

काया नाजुक कोंवळी देठ पोवळ्यांचे लाल
क्षणभंगुर जीवनीं नांव करितो उज्ज्वल ॥

प्रभुपदीं विसावण्या चाले याची धडपड
दिसे मातींतच देव घेई खालीं खालीं ओढ ॥

इवल्याश्या झुळुकीनें सडा पडतो भूवरीं
वाटे स्वर्ग उतरला त्याच्यासंगें धरेवरी ॥

हात पापी मानवाचे लागतांच कोमेजतें
घेई पाकळ्या मिटोनि करी समर्पण तेथें ॥

हास्य मोहक निष्पाप साक्षात्कार सौंदर्याचा
म्हणे मातींतच अंत मान राखा पावित्र्याचा ॥

शिकवण देतां देतां जाते मातींत मिळून
गंध भरे कणोकणीं फिरे वारा लोभावून ॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0015567
REFBK-0015567